मेहकर मतदारसंघात तिरंगी लढत >> पान 2

८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड >> पान 3

सिद्धार्थ खरात यांना विधानसभेत पाठवा : खा. मुकुल वासनिक >> पान 4

**सुविचार**
निरंतर प्रयत्नांमुळेच आपण यशस्वी होतो.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 95 ■ बुधवार, दि. 13 नोव्हेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



१६ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या त्या चित्रपटाने अक्षय कुमारला बनवला इंडस्ट्रीचा नवा 'किंग' आतील पान

## विधानसभा निवडणूक : ४२६ मतदान केंद्रांचे महिला करणार नियंत्रण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय निवडणूक आयोगाने 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्याचे आदेश दिले आहेत. यावेळी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात ४२६ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत. महिलांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापन करण्यात येणार आहे.

नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे एकूण ४५ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिलांकडे असणार आहे. यानंतर जळगावमध्ये ३३, गोंदिया ३२ आणि सोलापूर २९, मुंबई उपनगरमध्ये २६ महिला नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत. तर वाशिम, सिंधुदुर्ग, गडचिरोली, हिंगोली जिल्ह्यात सर्वात कमी प्रत्येकी तीन महिला नियंत्रित मतदान केंद्र असतील.

महिला नियंत्रित मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून विधानसभा निवडणुकीसाठी महिला





नियंत्रित महिला मतदान केंद्र असणार आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्दे शानुसार सर्व महिला नियंत्रित मतदान केंद्रात कोणताही विशिष्ट रंग वापरला जाणार नाही तसेच मतदान केंद्रातील कुठल्याही खास राजकीय पक्षाच्या रंगाचा अनावश्यक वापर होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापन करण्याच्या निर्णयामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. महिला मतदान केंद्र निवडताना केंद्राची सुरक्षितता लक्षात घेतली जाणार आहे. संवेदनशील केंद्र टाळून तहसील कार्यालय, पोलीस स्टेशननजीकच्या केंद्रांची तसेच ज्या मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांचा कायम संपर्क राहील, अशा केंद्राची या विशेष प्रयोगाकरिता निवड करण्यात येणार आहे.

जिल्हानिहाय महिला नियंत्रित मतदान केंद्र : अहमदनगर १२, अकोला ६, अमरावती ८, औरंगाबाद १३, बीड ८, भंडारा ८, बुलढाणा ७, चंद्रपूर ९, धुळे ५, जालना ६, कोल्हापूर १०, लातूर ६, मुंबई शहर १२, नागपूर १३, नांदेड ९, नंदुरबार ४, उस्मानाबाद ४, पालघर ६, परभणी ८, पुणे २१, रायगड ९, रत्नागिरी ६, सांगली ८, सातारा १७, ठाणे १८, वर्धा ९ आणि यवतमाळ ७ असे असणार आहेत.

## उद्योग विभागांतर्गत सर्व आस्थापनांना २० नोव्हेंबर रोजी मतदानासाठी सुट्टी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांना मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाने ही सूचना जारी केली आहे.

लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम १३५ (ब) नुसार, निवडणूक क्षेत्रातील कोणत्याही व्यवसाय, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनांत काम करणाऱ्या आणि विधानसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीस मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाईल. ही सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांसाठी लागू आहे. तसेच पोटकलम (१) नुसार या सुट्टीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणतीही कपात केली जाणार नाही.उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांनी या सूचनांचे काटेकोर पालन करावे. मतदारांना मतदानासाठी सुट्टी अथवा सवलत न मिळाल्याने मतदान करता न आल्यास, संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे परिपत्रकात उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने नमूद केले आहे.

## नवी मुंबईतील रो-हाऊसवर पोलिसांचा छापा, हाती लागले तब्बल अडीच कोटी रुपये

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात 'आदर्श आचारसंहिता' लागू आहे. निवडणुकीच्या काळात मतं मिळविण्यासाठी मतदारांना रोख रक्कम दिली जात असल्याचा विरोधकांकडून आरोप होत असतो. या बाबींना आळा घालण्यासाठी आयकर विभाग, मुंबई पोलीस आणि निवडणूक आयोगाचे कर्मचारी हे गस्त घालत असतात. तसंच छापेमारी करत असतात. त्यातच आता नवी मुंबईमधील नेरुळ सेक्टर १६ येथील रो-हाऊसमधून पोलिसांनी अडीच कोटी रुपये जप्त केले आहेत. नेरुळ पोलीस ठाणे आणि निवडणूक आयोग यांनी ही संयुक्त कारवाई केली आहे. या प्रकरणाबाबत अधिक माहिती अशी की, नवी मुंबईतील नेरुळ पोलीस ठाण्याला नेरुळ सेक्टर १६ येथील एका रो-हाऊसमध्ये बांधकाम व्यावसायिकाच्या घरात रोकड असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदरील रो-हाऊसवर छापा टाकण्यात आला असता एकूण २ कोटी ६० लाखांची रोकड सापडली. ही रक्कम कोणी आणि कोणत्या उद्देशानं घरात ठेवली होती, याचा अधिक तपास नेरुळ पोलीस करत आहेत.

निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोग आणि नेरुळ पोलीस ठाणे यांनी केलेल्या संयुक्त कारवाईत ही रोकड जप्त करण्यात आली आहे. याविषयी अधिक माहिती देत वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नायकवडी सांगितलं की, ''जप्त करण्यात आलेली रोकड कोणाची आहे? नवी मुंबईत कुठून आली? याचा तपास सध्या पोलिसांकडून सुरू आहे.''

## शुक्रवारी नायगाव मतदारसंघातील उमेदवारांच्या खर्चाची तीसरी तपासणी

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ८९-नायगाव विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांची निवडणूक खर्चाची तीसरी तपासणी तहसील कार्यालय, नायगाव येथे शुक्रवार १५ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते ५ वाजता या कालावधीत होणार आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षकासमोर सादर करणे आवश्यक आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस प्रत्येक उमेदवार एकतर तो स्वत: किंवा त्याच्या, तीच्या निवडणूक प्रतिनिधीद्वारे त्याला, तीला नामनिर्दे शित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे. या तपासणीस अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार कार्यवाहीस पात्र असतील तसेच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल यांची नोंद घ्यावी असे ८९-नायगांव विधानसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी स्वाती दाभाडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविली आहे.



## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई; ठाण्यात २०.७५ लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त





दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध पथकांनी ठाणे जिल्ह्यात अंजूरगाव आणि आलीमघर खाडीमध्ये हातभट्टी केंद्रावर ११ नोव्हेंबर रोजी सामुहिक धाडसत्र मोहिम राबवून एकूण सात गुन्हे नोंदविले आहे. या कारवाईत २०० लीटर क्षमतेच्या ३५४ ड्रम्स, १००० लीटर क्षमतेचे तीन बॉयलर व अन्य हातभट्टी साहित्याचा मुद्देमाल जप्त केला. सदर माल हा नाशवंत असल्यामुळे जागेवरच नष्ट करण्यात आला असून या मुद्देमालाची किंमत २० लाख ७५ हजार आहे.

या गुन्ह्यातील आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अन्वये सात गुन्हे नोंदविण्यात आले आहे. विधानसभा निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने आचारसंहिता काळात आदर्श आचारसंहितेचे पालन करून हातभट्टी दारू, अवैध मद्य निर्मिती केंद्रांवर राज्य उत्पादन शुल्क विभाग धाडसत्र राबवित आहे. अवैध मद्य निर्मिती, विक्री याविषयी तक्रार द्यावयाची असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ वर द्यावी, असे आवाहनही विभागामार्फत करण्यात आले आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने ही कारवाई पार पडली आहे. या कारवाईमध्ये ठाणे उपअधीक्षक वैभव वैद्य, दुय्यम निरीक्षक टी. सी. चव्हाण, आबा बोडरे, सहा. दुय्यम निरीक्षक एच.एम देवकाते, रणजीत आडे, ए. एम कापडे, जवान संदीप धुमाळ, अविनाश जाधव, रामचंद्र पाटील, राजू राठोड, भाऊसाहेब कराड, नारायण जानकर, विनोद अहीरे, प्रवीण धवणे, रूपेश खेमनार, नितीन लोखंडे यांनी सहभाग घेतला, असे कोकण उपआयुक्त प्रदीप पवार यांनी कळविले आहे.

## रेशन कार्डधारकांसाठी केंद्र सरकार लाँच करणार रेशन ॲप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** रेशन कार्डमुळे देशभरातील गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळत असतो. तसेच रेशन कार्डमुळे लोक अन्नासोबतच ते स्वत:च्या आरोग्यावर उपचारही करू शकतात. अशातच आता केंद्र सरकार रेशन कार्ड धारकांसाठी मोठं पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. रेशनशी संबंधित तक्रारींचे निवारण करण्यासाठी सरकार नवीन ॲप (रेशन न्यू ॲप) लाँच करणार आहे. सरकार ८० कोटी लोकांना रेशनचे वाटप करत असल्याची माहिती आहे. ॲपद्वारे लोक त्यांच्या तक्रारी सोडवू शकणार आहेत. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी वन नेशन वन रेशन कार्ड योजनेचा उद्देश देशभरातील स्थलांतरित कामगारांसाठी अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे आहे. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागामार्फत राबविण्यात येणारी ही योजना राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत देशभरात शिधापत्रिकांच्या पोर्टेबिलिटीला परवानगी देते आहे.

छत्र्ङअ अंतर्गत सर्व पात्र शिधापत्रिकाधारक त्यांच्या अन्न हक्काचा देशातील कोठूनही लाभ घेऊ शकतात. सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.





दरम्यान, सरकारने २०१९ मध्ये जछ्जठउ योजना सुरू केली. रेशन कार्डच्या देशव्यापी पोर्टेबिलिटीसाठी, खऱ्या किमतीची दुकाने किंवा पीडीएस केंद्रे झड उपकरणांनी सुसज्ज करण्यात आली आहे. तसेच बायोमेट्रिकली प्रमाणीकृत शझेड व्यवहार करण्यासाठी लाभार्थ्यांचा आधार क्रमांक शिधापत्रिकेशी जोडला गेला आहे.

दरम्यान, रेशन कार्डद्वारे रेशन घेणाऱ्यांसाठी १ नोव्हेंबरपासून नियम बदलणार करण्यात आले आहेत. नव्या गाइडलाईन्स जारी करण्यात आल्या आहेत. जर तुमचे ई केवायसी नसेल तर तुम्हाला रेशनवरील धान्य मिळणार नाही. तुम्हाला ईकेवायसी करणे बंधनकारक आहे. अनेकांनी अजूनही ई केवायसी केले नाही. त्यांच्यासाठी ३१ नोव्हेंबर ही तारीख शेवटची असणार आहे. त्यानंतर ई केवायसी केले जाणार नाही.





## निवडणूक काळात ५०० कोटींहून अधिक मालमत्ता जप्त

दैनिक आपला विदर्भ

### वाहन तपासणीसाठी ६,००० पथके तैनात

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचे पालन करण्यासाठी राज्यभर स्थिर व भरारी सर्वेक्षण पथके तैनात केली आहेत. एकूण ६ हजार पथकांमार्फत वाहनांची तपासणी करून संशयास्पद वस्तू जप्त केल्या जात आहेत, ज्यात आतापर्यंत ५०० कोटी रुपयांहून अधिक बेकायदा मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

निवडणूक काळात लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेनुसार राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी मतदारांना कोणत्याही प्रकारचे प्रलोभन दाखवू नये, अशी तरतूद आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या अंमलबजावणी यंत्रणा कार्यरत असून, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात स्थिर सर्वेक्षण पथके (एस.एस.टी.) आणि भरारी सर्वेक्षण पथके (एफ.एस.टी.) तैनात आहेत. या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एकूण ६ हजार पथके आणि १९ अंमलबजावणी यंत्रणा नियुक्त करण्यात आल्या आहेत.

स्थिर आणि भरारी पथकांना प्रत्येक वाहनाची तपासणी करून संशयास्पद काही आढळल्यास पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आहेत. निवडणूक काळात विविध पक्षांचे नेते आणि स्टार प्रचारक हवाई मार्गाने दौरे करतात; त्यांचे हेलिकॉप्टर्स आणि विमानांची देखील तपासणी केली जाते. सर्वच नागरिकांच्या वाहनांची तपासणी केली जाते व त्यामध्ये राजकीय पक्ष किंवा इतर कोणत्याही प्रकारचा अपवाद केला जात नाही. स्थिर सर्वेक्षण पथक नियुक्त असलेल्या ठिकाणांहून जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी होते, पथकामध्ये पोलीस कॉन्स्टेबलसह महसूल आणि इतर विभागाचे कर्मचारी असतात. तपासणी करताना नागरिकांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेतली जाते. संशयास्पद वस्तू आढळल्यास, जसे की पैसा, दारू, मौल्यवान धातू, त्या जप्त करून नियमाप्रमाणे कारवाई केली जाते.



महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुकीतील आचारसंहितेदरम्यान आतापर्यंत सर्व अंमलबजावणी यंत्रणा व स्थिर आणि भरारी पथकांनी ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीची मालमत्ता जप्त करून कार्यवाही केली आहे. त्यामुळे मतदारांना प्रलोभन देऊन मते मिळवण्याच्या प्रकाराला आळा बसला आहे.

तरीही असा कोणताही प्रकार नागरिकांच्या निदर्शनास आल्यास, सी-व्हिजिल ॲपद्वारे तक्रार करण्याचे आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत पुन्हा करण्यात आले आहे.

## इतर वेळेच्या फटाके बाजीवर देखील बंदी घाला

फटाके आणि दिवाळी हे समीकरणच आहे. दरवर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे वायू प्रदूषण तर होतेच पण त्यासोबतच ध्वनी प्रदुषण देखील होते. फटाक्यांचे केवळ इतकेच दुष्परिणाम आहेत असे नाही तर याशिवायही अनेक दुष्परिणाम फटाक्यांमुळे होतात म्हणूनच दरवर्षी दिवाळी आली की शासकीय यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटना नागरिकांना दिवाळीत जास्त फटाके वाजवू नका असे आव्हान करतात. फटाकेमुक्त दिवाळी साजरी साजरी व्हावी यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. शाळा, कॉलेजमधून त्याबाबत जनजागृती केली जाते. फटाक्यांचे दुष्परिणाम समजावून सांगितले जातात आणि ते योग्यही आहे, त्याची गरजही आहे. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करणे ही काळाचीच गरज आहे. फटाक्यांमुळे अनेक दुष्परिणाम होतात. सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांच्या आव्हानांना आणि प्रयत्नांना बऱ्यापैकी यश ही मिळत आहे. यावर्षी दिवाळीत फटाके वाजले मात्र मागील वर्षीच्या तुलनेत त्याचे प्रमाण कमी होते. फटक्यांबाबत नागरिकांची जनजागृती होतेय ही अतिशय चांगली गोष्ट आहे. फटाक्यांच्या दुष्परिणामाबाबत नागरिक जागरूक होत आहे ही स्वागतार्ह बाब आहे याबाबत सरकारी यंत्रणा, सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच पर्यावरणवादी संघटनांचे अभिनंदनच करायला हवे तसेच नागरिकांचेही आभार मानावे लागेल. नागरिकांनी दिवाळीत फटक्यांबाबात जी जागरूकता दाखवली ती इतर वेळेसही दाखवायला हवी. कारण आपल्या देशात केवळ दिवाळीतच फटाके वाजवले जातात असे नाही तर वर्षभर कोणत्या ना कोणत्या कारणांनी फटाके वाजवले जातात मग तो सण उत्सव असो की आनंदाचं प्रसंग. फटाके वाजवूनच सण – उत्सव, आनंदाचे क्षण साजरे करण्याची प्रथाच पडली आहे. काही लोक नवीन वर्षाचे स्वागत फटाक्यांच्या आतषबाजीने करतात. ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री कानठळ्या बसतील इतकी फटाके वाजवली जातात. थर्टी फर्स्ट साजरा करताना उन्माद दाखवण्याच्या खटाटोपात नागरिक फटकेबाजी करतात. नाताळच्या रात्रीही फटाके वाजवले जातात. ईदच्या दिवशी चांद दिसला की फटाके वाजवली जातात. वाढदिवस साजरा करताना फटाके वाजवण्याचे फॅड हल्ली सुरू झाले आहे. लग्नातही फटाक्यांची आतषबाजी पाहायला मिळते. दिवाळीत फटाके वाजवू नका असे आव्हान करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या राजकीय मेळाव्यात, विजयी मिरवणुकांतही फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी होते. दिवाळीत जास्त फटाके वाजू नयेत यासाठी प्रयत्न करणारे या इतर वेळी केल्या जाणाऱ्या फटाकेबाजीकडे मात्र सोईस्करपणे दुर्लक्ष करतात. दिवाळीच्या पाच दिवसांच्या फटाक्यांमुळे जे दुष्परिणाम होतात तेच इतर वेळेच्या फटाकेबाजीतही होतात. त्यामुळे या इतर वेळेच्या फटाक्यांच्या आतषबाजीवर देखील बंधने घातली पाहिजेत. नागरिकांनीही फटाके वाजवूनच आनंद साजरा केला पाहिजे ही मानसिकता बदलायला हवी. नागरिकांनी फटक्यांबाबत जी जागरूकता दिवाळीत दाखवली ती वर्षभर दाखवायला हवी.

# मेहकर मतदारसंघात तिरंगी लढत

## कोण मारणार बाजी; तर्कवितर्कांना उधाण

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर लोणार मतदारसंघ हा राखीव मतदार संघ असून या मतदारसंघावर गेल्या पंधरा वर्षापासून शिवसेनेचे आमदार संजय रायमुलकर हे प्रतिनिधित्व करत आहेत. मात्र गत दीड वर्षांपूर्वी घडलेल्या राजकीय घडामोडीने शिवसेनेत उभी फूट पडली आहे. त्यामुळे शिवसेना विरुद्ध शिवसेना असे राजकीय समीकरण निर्माण झाले आहे. त्यातच शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने दोनही शिवसेनेच्या वतीने या मतदारसंघाच्या उमेदवारीवर हक्क बजावला आहे. मुळात शिवसेनेचाच बालेकिल्ला असल्याने महायुती व महाविकास आघाडीकडूनही दोनही शिवसेनेला उमेदवारी दिली आहे. त्यामुळे शिंदे गटाच्या शिवसेनेकडून आमदार संजय रायमुलकर हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून मंत्रालय सहसचिव पदावरील प्रशासकीय अधिकारी म्हणून काम केलेले सिद्धार्थ खरात हे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्याचबरोबर या दोघांसमोरही मतदारसंघातील उच्च विद्याविभूषित, सुसंस्कृत व आपल्या राजकीय, सामाजिक कार्याच्या बळावर वंचित बहुजन आघाडीकडून डॉ.सौ ऋतुजा ऋषांक चव्हाण यांनी निवडणुकीत उडी घेतली आहे. त्यामुळे एरवी दुरंगी होणारी ही निवडणूक आता तिरंगी होत असल्याचे चित्र या मतदार संघात दिसून येत आहे. या तिरंगी लढतीत कोण बाजी मारणार याबाबत मात्र मेहकर विधानसभा मतदारसंघात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. मेहकर लोणार मतदार संघ हा आरक्षित असून या मतदारसंघात २०२४ साठी तब्बल १६ उमेदवार मैदानात उतरले असून आपले नशीब आजमावित आहेत. निवडणूक काळही अवघ्या आठ दिवसांवर आला आहे. त्यामुळे प्रचारात चांगलीच रंगत आली असून मेहकर लोणार मतदार संघात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ लोणार येथे जाहीर सभा घेत शिंदे शिवसेना गटाचे उमेदवार व महायुतीविरुद्ध टीका केली आहे. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड्. प्रकाश आंबेडकर यांनी मेहकर येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.सौ. ऋतुजा ऋषांक चव्हाण यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेत महाविकास आघाडी व महायुतीवर टीका करताना त्यांचा बेगडीपणा उघडा पाडण्याचे काम केले आहे. तर महायुतीच्या वतीने शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रचारार्थ शिवसेनेचे नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर सभा घेत महाविकास आघाडीवर टीका केली आहे. निवडणूक कालावधी अवघ्या आठ दिवसांवर आलेले असताना प्रचारात मात्र चांगलीच रंगत आली आहे. लढतीतील प्रमुख पक्षाच्या उमेदवारा प्रचारार्थ नेत्यांकडून जाहीर सभा घेतल्या जात आहेत. त्याचबरोबर अपक्ष उमेदवार ही प्रचारात मागे नसून आपल्या सामाजिक बळावर अपक्ष उमेदवारांनीही जीवाचे रान करीत संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत आहेत. निवडणूक कालावधी जसजसा जवळ येत आहे तसतशी राजकीय रंगत वाढत आहे. मात्र मेहकर लोणार मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात, महायुतीचे उमेदवार आमदार संजय रायमुलकर व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. सौ. ऋतुजा चव्हाण यांच्यात खरी लढत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. एरवी दुरंगी होणारी लढत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारामुळे मात्र तिरंगी होत असून थंडीत काळात राजकीय वातावरण चांगलेच गरम झाले आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

### प्रचारात एकमेकाचे उणेदुणे

विधानसभा निवडणुकीसाठी प्रचार जोरात सुरू असताना प्रमुख लढतीतील उमेदवाराकडून त्याचबरोबर अपक्ष उमेदवाराकडूनही परस्पर विरोधी उमेदवाराविरुद्ध प्रचारात एकमेकांचे उणेदुणे काढले जात आहे. विकासाचा मुद्दा त्याचबरोबर मतदार संघातील गैरप्रकार, रस्ते, पाणी, सिंचनाची सुविधा, पांदण रस्ते, वीजपुरवठा, शैक्षणिक असुविधा, बेरोजगारी अशा अनेक मुद्द्यांवर प्रचार होत असून उमेदवाराचे समर्थक मात्र या प्रमुख मुद्द्यासह उमेदवाराच्या विरोधात टीकाही करीत असल्याचे चित्र मतदारसघात दिसून येत आहे.

# मुंबई शहर जिल्ह्यात मतदानाच्या दिवशी दिव्यांग ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी विशेष सुविधा – जिल्हाधिकारी संजय यादव

– दिव्यांग व ज्येष्ठ नागरिक मतदारांनी आवश्यक मागणी 'सक्षम ॲप'वर नोंदवावी
– मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी मोफत वाहन व्यवस्था

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : आगामी विधानसभा निवडणुकीत मुंबई शहर जिल्ह्यातील दहा मतदारसंघांमध्ये २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. मुंबई जिल्हा निवडणूक यंत्रणेने दिव्यांग आणि ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदान केंद्रावर जाण्यासाठी विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सुविधा मिळविण्यासाठी दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांनी सक्षम पद्वारे आवश्यक मागणी नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आणि अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव यांनी केले आहे.

सक्षम पवर नोंदणी केलेल्या दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांसाठी व्हीलचेअर, व्हॅन, ईको व्हॅन, दिव्यांग सुलभ बसेस, टॅक्सी, तसेच मतदान केंद्रांवर जिन्यांवर चढण्यासाठी सरकत्या व्हीलचेअर यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मतदानाच्या दिवशीपर्यंत 'सक्षम प'वर दिव्यांग व ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदानासाठी सुविधा मागणी नोंदविता येणार आहे. 'सक्षम मोबाईल प'वर नोंदणी न करू शकलेल्या काही दिव्यांग व ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन त्यांची सुविधेसाठी मागणी नोंदविण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी श्री. यादव यांनी सांगितले.

दिव्यांग मतदारांकरिता मतदान केंद्रावर सुव्यवस्थित पोहचण्याकरिता, इमारतीत अधिक सहजपणे प्रवेश करण्यास किंवा भिन्न उंचीच्या भागात सुलभतेने पोहचण्यासाठी प्रत्येक मतदार केंद्राच्या दर्शनी भागामध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मतदान केंद्रावर दिव्यांग मतदारांसाठी प्रवेशसुविधा रॅम्पच्या माध्यमातून सुलभ केली जाणार आहे. तसेच मतदान प्रक्रियेत मदतीशिवाय सहभाग घेता यावा यासाठी ब्रेल चिन्हे असलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) देखील उपलब्ध असतील. अंध मतदारांसाठी ब्रेल मतपत्रिका, मतदार स्लिप ब्रेल लिपीमध्ये वाटण्यात आलेली आहे. अंध मतदारांकरिता प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी ब्रेल डमी, डमी मतपत्राला प्रत्येक मतदार केंद्रावर सुविधा



उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दिव्यांग मित्र आणि मोफत वाहतूक व्यवस्था

दिव्यांग मतदारांना मदत करण्यासाठी दिव्यांग मित्र समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ६७१ स्वंयसेवकांची नेमणूक मतदारांना मदत करण्यासाठी केली आहे. मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांसाठी १० विधानसभा मतदारसंघात मोफत बस सुविधा असेल. दिवसभर १० रिंगरूटवरील २४३ मार्गांवर दिव्यांग मतदारांना मोफत बस प्रवासाची सुविधा देण्यात येणार आहे.

मुंबई जिल्ह्यातील दिव्यांग मतदारांसाठी नियुक्त समन्वयक दिलीप यादव (मो. क्र. ९५९४१४४९९९) यांच्याशी संपर्क साधल्यास वाहन सुविधा उपलब्ध केली जाईल. दिव्यांग मतदारांनी रांगेत उभे न राहता मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. मुंबई शहर प्रशासन आणि दिव्यांग समन्वय अधिकारी यांच्यामार्फत सर्व दिव्यांग मतदारांना या सुविधांचा लाभ घेऊन मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'लालेलाल' कांद्याने केली शंभरी पार, ग्राहकांना दिलासा कधी मिळणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : दिल्लीत कांद्याचे भाव शतकाच्या जवळ पोहोचले आहेत. कांद्याच्या घाऊक भावाने आतापर्यंत मागील पाच वर्षातील उच्चांक गाठला आहे. निर्यातीत वाढ आणि पुरवठा घटल्याने कांद्याचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत.दिल्लीत कांदा ९० रुपये किलो ते १०० रुपये किलो दराने विकला जात आहे. राजस्थान, महाराष्ट्र आणि कर्नाटकातून येणाऱ्या कांद्याचा पुरवठा कमी आहे. त्यामुळे दरात वाढ होत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

तर दुसरीकडे नाशिकच्या बाजारपेठेत कांद्याच्या भावाने पाच वर्षातील उच्चांक गाठला आहे. नाशिकच्या बाजारपेठेत कांद्याचा भाव ५१ रुपये किलोवरून ५८ रुपये किलोवर पोहोचला आहे. सरकारने कांद्यावरील निर्यात शुल्क कमी केले आहे. बांगलादेशातील निर्यात झपाट्याने वाढली आहे. आता या महिन्याच्या अखेरीस म्हणजेच नोव्हेंबरपर्यंत नवीन कांद्याची आवक झाल्याने कांद्याचे भाव थोडे कमी होण्याची अपेक्षा आहे.

मुंबई बाजार समितीत कांदा आणि लसणाचा मोठी प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. कांद्याचे दर ८० रुपये किलो तर लसणाचे दर ४०० रुपयांवर जाऊन पोहोचले आहेत. तर मुंबईतील किरकोळ बाजारात कांदा ६० ते ८० रुपये दराने विकला जात आहे. राज्यातील बाजारसमित्यांमध्ये कांदा आणि लसूण यांची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा निर्माण झाला आहे.

# कुलाबा मतदारसंघातील मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी मतदारांनी पुढे यावे - अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : लोकशाहीच्या उत्सवात उत्स्फूर्त सहभाग घेऊन मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी जागरूक व जबाबदार नागरिक म्हणून कुलाबा मतदारसंघातील मतदारांनी पुढे यावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी येथे केले.

बायव्ह्यू मरीना गार्डन, कफ परेड येथे आयोजित कुलाबा परिसरातील मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी आयोजित खुल्या संवाद उपक्रमात डॉ. कुलकर्णी बोलत होते.



ते म्हणाले की, येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभेसाठी राज्यभरात मतदान होणार आहे. मतदानाचे प्रमाण वाढवण्यासाठी निवडणूक आयोगामार्फत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या मतदारसंघांमध्ये कुलाबा मतदारसंघाचा समावेश होता. राज्याच्या आणि देशाच्या महत्त्वाच्या क्षेत्रात वेगळे स्थान असलेल्या कुलाबा सारख्या नामांकित ठिकाणातील मतदान टक्केवारी कमी असणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे निवडणूक आयोग मतदारांपर्यंत पोहोचून त्यांची जनजागृती करण्याचे काम करत आहे. राज्यात विविध मतदारसंघात जनजागृती उपक्रमाला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदारांनी मतदान प्रक्रियेविषयी व्यापक आणि कृतीशील दृष्टिकोन ठेवावा, असे आवाहन डॉ. कुलकर्णी यांनी केले. मतदान प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने निवडणूक आयोगामार्फत मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मतदारांना आपले नाव व मतदान केंद्र शोधणे सोपे व्हावे म्हणून मतदार यादी संकेतस्थळावर तसेच वोटर पवर उपलब्ध आहे. विधानसभा निवडणुकांसाठी उंच इमारती व गृहसंकुलांसाठी १,१८५ मतदान केंद्रे, वाहनतळ सुविधा, तसेच दोन किलोमीटरच्या अंतरावर मतदान केंद्रांची सुविधा दिली आहे. या सर्व सुविधांचा लाभ घेत, मतदारांनी मतदानासाठी पुढे येण्याचे आवाहन डॉ. कुलकर्णी यांनी यावेळी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### किरीट सोमय्या पुन्हा एकदा नवघर पोलीस ठाण्यात; सामना ला पाठवली नोटीस



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** सोमय्या आज पुन्हा एकदा नवघर पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत. किरीट सोमया आणि त्यांच्या कुटुंबाबद्दल गंभीर आरोप असलेली बातमी सामना मध्ये आली होती. या बाबत त्यांनी सामना ला नोटीस पाठवली आहे. तसेच मराठी मुस्लिम सेवा संघाच्या आर्थिक व्यवहार च्या चौकशी ची मागणी त्यांनी केली आहे. उद्धव ठाकरे यांची बॅग तपासली तशी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांची ही तपासली होती आता माफी मागा अशी मागणी सोमय्यांनी केली आहे. तर पटोले यांचे मानसिक संतुलन बिघडले असल्याचे सोमय्या म्हणाले.

### महायुतीचे उमेदवार संजय केळकर यांच्या प्रचारार्थ खासदार मनोज तिवारी यांचा रोड शो



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी:** भारतीय जनता पक्षाचे ठाणे शहर विधानसभेचे उमेदवार संजय केळकर यांच्या प्रचारासाठी भारतीय जनता पार्टी दिल्ली अध्यक्ष व खासदार मनोज तिवारी हे आज ठाण्यामध्ये आले होते. यावेळी भाजपच्या वतीने जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात आले. मोदींचे विचार आहेत तुमच्या साठी सर्व समस्यांचे निराकरण करणार. पहिले मी गाणी गायचो परंतु आता मोदींच्या नेतृत्वात काम करतो आहे. मोदी यांचे डबल इंजिन चालायला हवे मोदींनी सांगितले आहे यंदा देखील केळकर जिंकतील असे यावेळी मनोज तिवारी ठाण्यात म्हणाले आहेत.

### मुंबादेवी विधानसभा मतदारसंघात १०३ ज्येष्ठ नागरिक व ११ दिव्यांग मतदारांचे गृह मतदान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ रोजी मतदान होणार आहे. मुंबई शहर जिल्ह्यात मतदान केंद्रावर उपस्थित राहू शकत नसलेल्या, प्रपत्र १२ ड भरलेल्या ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांसाठी टपाली मतदान पथकामार्फत घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अंतर्गत मुंबादेवी विधानसभा मतदारसंघात आज एकूण १०३ ज्येष्ठ नागरिक आणि ११ दिव्यांग मतदारांनी गृह टपाली मतदान केले.

मुंबादेवी मतदारसंघात ८५ वर्षांवरील एकूण ११८ ज्येष्ठ नागरिक मतदार आहेत, त्यापैकी १०३ अर्जदारांनी, तसेच १३ पैकी ११ दिव्यांग मतदारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रपत्र १२ ड भरून जमा केले होते. या ११४ अर्जदारांचे आज गृह टपाली मतदान घेण्यात आले.

मुंबई शहर जिल्ह्यातील दहा मतदारसंघांत ८५ वर्षांवरील २१३७ ज्येष्ठ नागरिक मतदार व २१९ दिव्यांग मतदार गृह टपाली मतदानासाठी पात्र ठरले आहेत. १६ नोव्हेंबर २०२४ पर्यंत गृह टपाली मतदान प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

भारत निवडणूक आयोगाने ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांसाठी उपलब्ध करून दिलेल्या या घरपोच मतदान सुविधेचे स्वागत केले असून, टपाली मतदान पथकाचे आभार मानले आहेत.

### मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील माध्यम कक्षास केंद्रीय निवडणूक निरीक्षकांची भेट

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४च्या तयारीच्या अनुषंगाने मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षास केंद्रीय निवडणूक निरीक्षक समीर वर्मा, सत्यप्रकाश टी. एल., तसेच केंद्रीय खर्च निरीक्षक विजय बाबू वसंता यांनी भेट देऊन माहिती घेतली. यावेळी मुंबई शहर जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी संजय यादव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्यामसुंदर सुरवसे उपस्थित होते.

केंद्रीय निरीक्षकांनी माध्यम कक्षाच्या नियोजनबद्ध कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले व दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. कक्षात दररोज येणाऱ्या विविध वृत्तपत्रे व दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील बातम्यांची नोंद घेण्याची, जाहिरातींचे अवलोकन करण्याची पद्धत याविषयीही त्यांनी जाणून घेतले. सोशल मीडियावर मुंबई शहर जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांच्या फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम, व इतर सोशल मीडियावरील जाहिराती व पोस्ट्सवर लक्ष ठेवण्याबाबत त्यांनी सूचना दिल्या. प्रसार माध्यम कक्षाच्या समन्वय अधिकारी काशीबाई थोरात यांनी कक्षाच्या कामकाजाची माहिती दिली.

# ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ ची परतफेड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ अदत्त शिल्लक रकमेची परतफेड दि. ९ डिसेंबर, २०२४ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. १० डिसेंबर, २०२४ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येईल, असे वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा), सचिव श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.



परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ अन्वये महाराष्ट्र शासनाने उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. १० डिसेंबर २०२४ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

सरकारी प्रतिभूती विनियम, २००७ च्या उप-विनियम २४ (२) व २४(३) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास/ त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.

तथापि, बँक खात्याच्या संबधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.१६ % महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२४ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली., असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केलें जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घेतली पाहिजे. रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोकऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणा-या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील, असे वित्त विभागाच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे.

### दानवेंनी कार्यकर्त्याला लाथ मारल्याचा व्हिडिओ व्हायरल! विरोधकांची टिकेची झोड

**मुंबई/प्रतिनिधी:** भाजप नेते रावसाहेब दानवे यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. यात व्हिडिओमध्ये रावसाहेब दानवे एका कार्यकर्त्याला लाथ मारत असल्याचे दिसून येत आहे. यावरून महाविकास आघाडीने रावसाहेब दानवे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. आता ज्या कार्यकर्त्याला रावसाहेब दानवे यांनी लाथ मारली, ते शेख हमद यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणुकीचा प्रचार सुरू झाल्यानंतर जालना विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांच्या प्रचारात भाजप सक्रिय नसल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून रंगत आहेत. या पार्श्वभूमीवर अर्जुन खोतकर यांनी सोमवारी रावसाहेब दानवे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती. यावेळी अर्जुन खोतकर आणि रावसाहेब दानवे यांनी एकमेकांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार देखील केला.

# ''इधरकू तुम्हारा कोई कामा नहीं'', फडणवीसांकडून हैदराबादी भाषेत ओवैसींना चिमटा; औरंगजेबाचा उल्लेख करत म्हणाले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्याचे उपमुख्यमंत्री व भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी रात्री मुंबईतल्या मालाड व जोगेश्वरीमध्ये दोन प्रचारसभा घेतल्या. या प्रचारसभांमधून त्यांनी महाविकास आघाडीसह ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांच्यावर टीका केली. मालाडमध्ये फडणवीसांनी भाजपा उमेदवार विनोद शेलार यांच्यासाठी घेतलेल्या प्रचारसभेत ओवैसी यांना त्यांच्याच हैदराबादी भाषेत महाराष्ट्रात येऊ नका असं सांगितलं. तर, गोरेगावचे भाजपा उमेदवार विद्याताई ठाकुर व वर्सोवाचया भाजपा उमेदवार डॉ. भारतीताई लव्हेकर यांच्या प्रचारार्थ जोगेश्वरी पश्चिम, मुंबई येथे देखील जाहीर सभा घेऊन विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''हल्ली ते ओवैसीदेखील (हैदराबादचे खासदार व एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी) आपल्या राज्यात, इथल्या मतदारसंघांमध्ये येऊ लागले आहेत, फिरू लागले आहेत. मला त्यांना सांगायचं आहे, मेरे हैदराबादी भाई, उधरी रहना, इधरकू मत आना, इधरकू तुम्हारा कोई कामा नहीं (माझ्या हैदराबादी भावा, तू तिकडेच थांब, इथे येऊ नको, इथे तुझं काही काम नाही.) मला एक गोष्ट कळत नाहीये इथे नेमकं काय चाललंय? इथे येऊन आम्हाला धमक्या दिल्या जात आहेत. औरंगजेबाचं महिमामंडन केलं जातंय. त्या लोकांना मला सांगायचं आहे की भारताचा जो सच्चा मुसलमान आहे तो औरंगजेबाला आपला हिरो मानत नाही. कारण औरंगजेब हा एक आक्रमणकारी होता. त्याने आमच्यावर अनेक आक्रमणं केली आहेत. म्हणून मी म्हणतो, अरे सुन ले ओ ओवैसी, कुत्ता भी ना पेशाब करेगा औरंगजेब की पहचान परष्ठ अब तो तिरंगा लहरायेगा पूरे पाकिस्तान पर!''





फडणवीसांची उद्धव ठाकरेंवर टीका

फडणवीसांनी यावेळी शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली. ते म्हणाले, मुंबईतील मराठी माणसाला बेघर करण्याचे काम उबाठाने केले. मी इथे विद्याताई ठाकूर आणि भारतीताई लव्हेकर यांच्यासाठी आशीर्वाद मागण्यासाठी आलो आहे. यापूर्वी मुंबईकरांना केवळ स्वप्ने दाखवली जात होती, काहीही न करता 'करुन दाखवले' अशी होर्डिंग्स लावली जात होती. पूर्वीच्या काँग्रेस सरकारने ११ वर्षात ११ किलोमीटरची मेट्रो तयार केली. २०१४ मधील आपल्या सरकारने आणि नंतरच्या काळातील महायुती सरकारने पाच वर्षात ३५४ किलोमीटर लांबीचे मेट्रोचे जाळे उभारले, त्यापैकी १०० किमीचे काम पूर्णत्वासही आलेले आहे.

मुंबईत आपल्या सरकारने कोस्टल रोड तयार केला. देशातील सर्वात मोठा २२ किमीचा सागरी सेतू बांधला. वांद्रे-वर्सोवा सी-लिंकचे काम आपल्या सरकारने सुरु केले. विरार ते वर्सोवा अशी कनेक्टिव्हिटी आपण आता करत आहोत. खऱ्या अर्थाने मुंबईचा चेहरा बदलण्याचे काम आपण करत आहोत मात्र विकास करत असताना कोळी बांधवांवर कोणताही अन्याय होणार नाही याची दक्षताही आपण घेतलेली आहे.

# १६ वर्षापूर्वी प्रदर्शित झालेल्या त्या चित्रपटाने अक्षय कुमारला बनवला इंडस्ट्रीचा नवा 'किंग', तो झाला होता मालामाल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता अक्षय कुमार दरवर्षी सुमारे अर्धा डझन चित्रपट करण्यासाठी ओळखला जातो. काही चित्रपट चालतात, तर काही चालत नाहीत. पण याने अभिनेत्याला काही फरक पडत नाही. करिअरच्या सुरुवातीपासूनच तो चित्रपट करत राहिला. या काळात एक काळ असा आला की, त्याचे चित्रपट खूप यशस्वी झाले. हा त्याचा सुवर्णकाळ म्हणता येईल. याच दरम्यान २००८ मध्ये सिंग इज किंग हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या वर्षी त्याचे फक्त ३ चित्रपट प्रदर्शित झाले होते. कदाचित अक्षयच्या चाहत्यांनाही दोन चित्रपटांची नावे माहीत नसतील. पण तिसऱ्या चित्रपटानेही अक्षयला श्रीमंत केले आणि काही वेळातच तो बॉलिवूडचा नवा किंग घोषित झाला.

सिंग इज किंग हा चित्रपट अनीस बज्मी यांनी दिग्दर्शित केला होता. या चित्रपटात अक्षय कुमार एका शीखच्या भूमिकेत दिसला होता. पगडी अक्षयच्या व्यक्तिरेखेला साजेशी होती आणि चाहत्यांना त्याचे पात्र आवडले. कतरिना कैफसोबतची त्याची केमिस्ट्रीही खूप गाजली. वृत्तांवर विश्वास ठेवला, तर चित्रपटाचे बजेट जवळपास ३० कोटी रुपये होते आणि चित्रपटाने जवळपास १३० कोटींची कमाई केली होती. परदेशातही या चित्रपटाचे चांगले कलेक्शन होते. त्याची गाणी आणि दृश्ये आजही चाहत्यांच्या आठवणीत ताजी आहेत.

शाहरुख खानला इंडस्ट्रीचा किंग मानला जातो हे सर्वांनाच माहीत आहे. त्याचे चाहते त्याला किंग मानतात. तो देशातील सर्वात श्रीमंत अभिनेता आहे. तो देशातील सर्वात लोकप्रिय अभिनेता आहे. तो जगभरातील सर्वात कौतुकास्पद अभिनेत्यांपैकी एक आहे. तो बॉक्स ऑफिसवर राज्य करतो. तो रोमान्सचा राजा आहे. मग अशा स्थितीत त्याला राजा का म्हणू नये? पण २००८ च्या सुमारास, रोमान्सचा बादशाह शाहरुख खान त्याची रोमँटिक इमेज तोडून स्वत:ला पुन्हा शोधण्याचा प्रयत्न करत होता. त्याची ही युक्ती त्याच्यासाठी किती उपयोगी पडली हे माहीत नाही, पण त्याचा थेट फायदा अक्षय कुमारला झाला.

वास्तविक, वीर जरा, कल हो ना हो सारख्या चित्रपटांच्या यशानंतर शाहरुख खान रोमँटिक अभिनेता म्हणून पूर्णपणे स्टिरियोटाइप झाला होता. अशा परिस्थितीत, अभिनेत्याला स्वत:च्या या प्रतिमेपासून दूर राहून काम करायचे होते. या काळात त्याचे काही चित्रपट आले आणि गेले. त्याने चक दे इंडिया, माय नेम इज खान आणि रब ने बना दी जोडी सारखे चित्रपट आणले. मात्र यामध्ये त्याने त्याच्या लूकमध्ये बदल केले होते.

हा तो काळ होता जेव्हा शाहरुखची लोकांवरील पकड हळूहळू कमी होत होती आणि त्याची जादू आता पूर्वीसारखी चालत नव्हती. मात्र अक्षय कुमार सिंग इज किंगने सर्वत्र प्रसिद्ध झाला आणि १-२ वर्षानंतर एक वेळ अशी आली की अक्षयला किंग म्हणून संबोधले जाऊ लागले. पण बॉलीवूडच्या खिलाडी कुमारने एका संवादानंतर याचा इन्कार केला होता आणि बॉलिवूडमध्ये एकच बादशाह असल्याचे सांगितले होते. तो म्हणजे शाहरुख खान.

आता अक्षय कुमारच्या सिंग इज किंग या चित्रपटाचा सिक्वेल बनवणार आहे. याबाबत नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटातील कलाकारांचा अद्याप खुलासा झालेला नाही मात्र अक्षय या चित्रपटात नसल्याची खात्री झाली आहे. यामुळे चाहतेही निराश झाले आहेत.

मात्र या चित्रपटाची मुख्य भूमिका कोण असणार याबाबत अद्याप काहीही समोर आलेले नाही. या भूमिकेसाठी रणवीर सिंगच्या नावाची चर्चा आहे.

### खलिस्तानी दहशतवादी पन्नूनं दिली राम मंदिर उडवण्याची धमकी; सुरक्षेत वाढ

अयोध्या : काही महिन्यांपूर्वी दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदनं राम मंदिर बॉम्बनं उडवून देण्याची धमकी दिली होती. या धमकी प्रकरणाचा एक ऑडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा राम मंदिर बॉम्बनं उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यामुळं राम मंदिराच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. खलिस्तानी दहशतवादी आणि शीख फॉर जस्टिस प्रमुख गुरपतवंत सिंग पन्नू यानं एक व्हिडिओ जारी करून ही धमकी दिली आहे. या व्हिडिओत १६ आणि १७ नोव्हेंबरला राम मंदिरात हिंसाचार होणार असल्याचं सांगण्यात आलंय. तसंच हिंदुत्वाच्या विचारसरणीचं ठिकाण असलेल्या अयोध्येला आम्ही हादरवून टाकू, असंही व्हिडिओत म्हटलंय. पन्नूनं जारी केलेल्या व्हिडिओमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीही राम मंदिरात पूजा करताना दिसत आहेत. या धमकीनंतर रामजन्मभूमी परिसर हाय अलर्टवर आहे.या संदर्भात अधिक माहिती देत अयोध्याचे सीओ आशुतोष तिवारी म्हणाले, ''व्हिडिओ रिलीज झालाय, त्याचा अभ्यास आम्ही करतोय. अयोध्या आणि श्री रामजन्मभूमीची सुरक्षा वाढवण्यात आली असून अलर्ट घोषित करण्यात आलाय.'' तर आयजी प्रवीण कुमार यांनी सांगितलं, ''व्हिडिओच्या माध्यमातून दहशतवादी पन्नूकडून धमकी मिळाली आहे. यापूर्वीही राम मंदिराला अशा धमक्या मिळाल्या आहेत. आम्ही पुन्हा सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतोय,''. तर यापूर्वी २२ ऑगस्टलाही अशाच प्रकारची धमकी देण्यात आली होती. रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या हेल्प डेस्क मोबाईल क्रमांकावर व्हॉट्सअॅपद्वारे ही धमकी देण्यात आली होती. मंदिर लवकरच नष्ट होईल, असं त्यात लिहिलं होतं.

# अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांची 'जय महाराष्ट्र', 'दिलखुलास'कार्यक्रमात मुलाखत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'जय महाराष्ट्र'आणि 'दिलखुलास'कार्यक्रमात 'विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता 'राज्य निवडणूक आयोगाची तयारी' याविषयावर राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. डॉ. कुलकर्णी यांची मुलाखत 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे.

एक्स - https://twitter.com/MahaDGIPR

फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR

यू ट्यूब - https://www.youtube.co/M-H-R-SHTR-DGIPR

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. १२ आणि बुधवार दि. १३ नोव्हेंबर २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल अॅपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. निवेदक डॉ. मृण्मयी भजक यांनी ही मुलाखत घेतली आहे.

राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाची तर २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. विधानसभेची ही निवडणूक नि:पक्षपाती वातावरणात पार पडावी यासाठी राज्य निवडणूक आयोगामार्फत नियोजनबद्ध तयार करण्यात आली आहे. या कालावधीत आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी, मतदान केंद्र व मतमोजणी केंद्रांवर करण्यात आलेली तयारी आणि उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोई सुविधा, मतदार जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले उपक्रम, कायदा व सुव्यवस्था, राज्यातील सर्वच घटकातील मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी केलेली तयारी याबाबत अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी 'दिलखुलास'आणि 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमातून माहिती दिली आहे.



# सिद्धार्थ खरात यांना विधानसभेत पाठवा : खा. मुकुल वासनिक

## शेतकऱ्यांचं ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ केले जाणार!

दैनिक आपला विदर्भ






**मेहकर / प्रतिनिधी:** महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्याबरोबर पहिल्याच आठवड्यात शेतकऱ्यांचं ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज माफ करण्यात येणार आहे आणि जे शेतकरी नेहमीत कर्ज भरतो त्याला प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत केली जाईल, असा निर्णय महाविकास आघाडीच्या नेत्यांनी घेतला आहे. दुष्काळ, अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीसह हमीभावाच्या प्रतीक्षेतील शेतकरी सध्या अडचणीत असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यासाठी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी मेहकर विधानसभा मतदारसंघातून आपल्या हक्काचा माणूस असलेले सिद्धार्थ रामभाऊ खरात यांना विधानसभेत पाठवा असे प्रतिपादन खासदार मुकुल वासनिक यांनी केले. खा.मुकुल वासनिक हे महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ खरात यांच्या प्रचारार्थ जानेफळ येथे आले होते. त्यावेळी खासदार मुकुल वासनिक जाहीर सभेत बोलत होते. यापुढे बोलताना खासदार मुकुल वासनिक म्हणाले की, आता महालक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना दर महिन्याला ३००० रुपये देण्यात येणार आहेत. त्यासाठी येत्या २० तारखेला सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या मशाल निशाणीवर शिका मारुन त्यांना विधानसभेत पाठवा असे खासदार मुकुल वासनिक यांनी सांगितले आहे. यावेळी महाविकास आघाडीच्या प्रचारसभेच्या व्यासपीठावरुन अनेक मान्यवरांनी उपस्थिती नागरिकांना संबोधित केले, त्यापैकी प्रास्ताविक कॉंग्रेसपक्षाचे तालुकाध्यक्ष देवानंद पवार यांनी केले, तसेच कॉंग्रेसपक्षाचे गणेशराव देवकर, कॉंग्रेसपक्षाचे नेते प्रकाश धुमाळ, मेहकर विधानसभा पक्षनेते अनंतराव वानखेडे, माजी सभापती नंदुभाऊ बोरे, माजी नगराध्यक्ष कासमभाई गवळी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, कॉंग्रेसपक्षाचे जेष्ठनेते लक्ष्मणदादा घुमरे, कॉंग्रेसपक्षाचे प्रदेश सरचिटणीस श्यामभाऊ उमाळकर, माजी जिल्हाध्यक्ष विजय अंभोरे, कॉंग्रेसपक्षाचे उपजिल्हाध्यक्ष संजय राठोड, भीमशक्तीचे विदर्भ अध्यक्ष दिलीप भोजराज, महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात, राष्ट्रवादीचे नेते गजानन तात्या कृपाळ, शिवसेना संपर्कप्रमुख प्रा.नरेंद्र खेडेकर, कॉंग्रेसपक्षाचे खासदार मुकुल वासनिक, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर महाविकास आघाडीचे पदाधिकारी मान्यवर उपस्थित होते. शिवसेना संपर्कप्रमुख प्रा नरेंद्र खेडेकर म्हणाले की, ज्यांनी गद्दारी केली त्यांना परत निवडून देणार आहात का! आपलं महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आल्याबरोबर शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात निर्णय घेण्यात येणार आहे. त्यासाठी सिद्धार्थ रामभाऊ खरात यांच्या एक नंबरचे बटन दाबून त्यांना विजयी करायचे आहे असे प्रा. नरेंद्र खेडेकर यांनी सांगितले. यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात म्हणाले की, सततच्या नापिकीमुळे शेतकरी राजा हतबल झालेला आहे. त्यातच त्यांच्या सोयाबीन पिकाला योग्य हमीभाव मिळत नाही. त्यामुळे जनतेच्या मनात नाराजीचा सूर उमटलेला आहे. येथे सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार नाही, पंधरा वर्षांपासून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात पण येथील जनतेचा विकास झालेला नाही. साधं मेहकर एसटी बसस्टँड नाही, गावागावात स्मशानभूमी व्यवस्थीत नाहीत , रस्ते नाहीत. पाणी वेळेवर मिळत नाही. येथील जनतेचा विकास झालेला नाही. यासाठी आता मशाल निशाणी समोरील बटन दाबून, मला बहुमतांनी विजयी करा असे महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांनी आपल्या प्रचारसभेतील नागरिकांना संबोधित करतानी म्हणालेत.

## विविध वृत्त...

### शेतमालाची आर्द्रता तपासण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी:** सोयाबीन शेतमालाची आर्द्रता मोजण्यासाठी जे शेतकरी सोयाबीन नमुने खरेदी केंद्रावर घेवून येतील त्यांना तात्काळ आद्रता तपासून द्यावे. तसेच गावोगावी आपले कर्मचाऱ्यांनी आर्द्रतामापक यंत्र नेवुन शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सोयाबीन शेतमालची प्रात्याक्षिक दाखविण्यात यावे. १२ टक्के आद्रता (मॉईश्चर) पेक्षा कमी असलेले व एफएक्य (FAQ) दर्जाचे सोयाबीनच खरेदी केंद्रावर विक्रीस आणावेत, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी केले आहे.

### शुक्रवारी दिव्यांग तपासणी शिबीर रद्द

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी:** जिल्हा सामान्य रूग्णालयात नियमितपणे शुक्रवारी दिव्यांग तपासणी शिबीर घेण्यात येते. मात्र शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी गुरुनानक जयंतीनिमित्त सुट्टी असल्यामुळे दिव्यांग तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी तपासणीसाठी येऊ नये, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बि.एस. भुसारी यांनी केले आहे.

### राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात ४१३६ उमेदवार

**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील विधानसभा निवडणुका २८८ मतदारसंघांमध्ये होणार आहेत या निवडणुकीचे मतदान २० नोव्हेंबर रोजी होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर केला जाईल. राज्यात एकूण ४१३६ उमेदवार आहेत ज्यामध्ये ३७७१ पुरूष, ३६३ महिला आणि अन्य २ उमेदवार आहेत.

राज्यातील एकूण उमेदवाराचे नाव, पत्ता, राजकीय पक्ष, मतदारसंघ आदी संपूर्ण यादीसाठी खालील लिंकवर क्लिक करावे.https://ceoelection.maharashtra.gov.in/Downloads/PDF/List-Of-Contesting-Candidate-Notification--C2024.pdf

### बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानला मिळाली धमकी, मुंबई पोलिसांनी रायपूरच्या वकिलाला केली अटक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** अभिनेता सलमान खाननंतर नुकतेच शाहरुख खानला जीवे मारण्याच्या धमक्या आल्या होत्या. यानंतर मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. धमकी प्रकरणी छत्तीसगडच्या रायपूर येथून एका संशयित व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. सध्या बॉलिवूडमध्ये स्टार्सना सतत धमक्या येत आहेत. सलमान खान सध्या लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या निशाणावर आहे. दरम्यान, शाहरुख खानलाही जीवे मारण्याच्या धमकी आल्यानंतर आता बॉलिवूडमध्ये अनेकजण घाबरून आहेत. याप्रकरणी पोलिसात नोंद करण्यात आली आहे. आता मुंबई पोलिसांना धमकी प्रकरणी संशयित व्यक्तीची चौकशी सुरू केली आहे.

शाहरुखला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला अटक : मिळालेल्या माहितीनुसार, व्यक्तीच्या अटकेबाबत मुंबई पोलिसांनी सांगितलं की, शाहरुख खानला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीचं नाव मोहम्मद फैजान असून तो एक वकिल आहे. या वकिलानं शाहरुख खानकडून ५० लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. या आरोपीला रायपूर, छत्तीसगड येथून ताब्यात घेतलं आहे. शाहरुख खानला मिळालेल्या धमकीची माहिती वांद्रे पोलिसांना मिळाली होती. पोलीस ठाण्यातच एक फोन आल्याचे सांगण्यात आलंय. ५ नोव्हेंबर रोजी वांद्रे पोलिस स्टेशनच्या नंबरवर एक फोन आला आणि आरोपीनं यात म्हटलं ''तो बँडस्टँडचा शाहरुख आहे, त्याला ५० लाख द्याला लावा नाहीतर मी त्याला मारून टाकेन.'' ती व्यक्ती कोण बोलत आहे, असं पोलिसांनी विचारलं असता त्यानं सांगितलं की, ''काही फरक पडत नाही, माझे नाव हिंदुस्थानी लिहा.''

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४; कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. कार्यक्रमानुसार विधानसभा मतदारसंघासाठी दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. नागरिकांना हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. जिल्ह्यातील सर्व मतदारसंघातील कामगारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आदेश जिल्हा निवडणुक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. २४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार बुलडाणा जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघातील सर्व कामगार, कर्मचारी मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्याकरीता भरपगारी सुट्टी देण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल. तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, बुलडाणा यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहील. मतदानासाठी सुट्टी किंवा पूर्वपरवानगीने सवलत न दिल्यास आस्थापना धारकाविरूद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तरी बुलडाणा जिल्ह्यातील सर्व कामगार मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरीता सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांनी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी म. तु. जाधव यांनी केले आहे.

## गडचिरोली-अहेरी मतदारसंघ निवडणूक : आधीच लेकीचं आव्हान, त्यात पुतण्याने घेरलं

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली / प्रतिनिधी :** यंदाच्या विधानसभा निवडणुकीत चांगलीच चुरस निर्माण झाली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर या निवडणुकीतील पक्षांची संख्या वाढली आहे. दुसरीकडे विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात रक्ताची नातीदेखील एकमेकांसमोर उभी ठाकली आहेत. निवडणुकीच्या मैदानात लेकीचे आव्हान असताना पुतण्याने देखील उमदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे महायुतीच्या दिग्गज उमेदवाराला कडवं आव्हान निर्माण झाले आहे. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर शरद पवारांची साथ सोडत अजित पवारांचे घड्याळ हाती घेणारे धर्मरावबाबा अत्राम यांच्यासमोर त्यांच्याच घरातील लोकांचे आव्हान उभे राहिले आहे.

गडचिरोलीतील अहेरी विधानसभा मतदारसंघावर अपवाद वगळता मागील सहा दशकांपासून अत्राम या राजघराण्याने वर्चस्व ठेवले आहे. यंदाच्या निवडणुकीत कुटुंबातील तीन सदस्यांनी एकमेकांसमोर शड्डू ठोकला आहे. त्यामुळे विजयाचा गुलाल कोण उधळणार याची चर्चा सुरू झाली आहे.

अन्न व औषध प्रशासन मंत्री आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते धर्मरावबाबा यांच्याविरुद्ध त्यांची मुलगी उभी आहे. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून अत्राम यांच्या कन्या भाग्यश्री अत्राम यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. वडील आणि मुलीच्या या लढाईत भाजपचे माजी राज्यमंत्री अंबरिश अत्राम यांनी बंडखोरी करत निवडणुकीच्या मैदानात एन्ट्री घेतली. तर, दुसरीकडे काँग्रेसकडून इच्छुक असलेले हनमंतु मडावी यांनीही अपक्ष उमेदवारी दाखल केली. त्यामुळे चुरशीची लढत अतिशय अटीतटीच्या वळणावर आहे.

महायुतीत भाजप तर महाविकास आघाडीत काँग्रेसने बंडखोरी केली. पण या बंडखोरीमुळे दोन्ही आघाड्यांनी एकमेकांवर कुरघोडी केली असल्याचे म्हटले जात आहे. आता या चौरंगी लढतीत कोण सरस ठरणार, मतदारराजा कोणाला कौल देणार हे येत्या काही दिवसात स्पष्ट होईल.

लोकसभा निवडणुकीत अहेरी मतदारसंघातून काँग्रेसला जवळपास १२ हजारांचे मताधिक्क्य मिळाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत महायुतीसमोर मोठं आव्हान आहे.

## राज ठाकरे हे दुसरे मोरारजी देसाई; संजय राऊतांचा राज ठाकरेंवर हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई / प्रतिनिधी :** जस जशी विधानसभा निवडणूक जवळ येत आहे, तस तसे एकमेकांवर चिखलफेक करण्यात राजकीय नेते जोमाने पुढे सरसावताना दिसत आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा गट यांच्यातील आरोप-प्रत्यारोपसुद्धा अशाच पद्धतीनं पुढे जाताहेत. उबाठा गटाचे नेते, खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर हल्लाबोल करत त्यांना इशारा दिलाय. याप्रसंगी बोलताना संजय राऊत म्हणाले आहेत की, राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्यापूर्वी भान ठेवावे. राज ठाकरे हे गुजरातमधील दोन व्यापाऱ्यांनी दिलेली स्क्रिप्ट वाचत असल्याचा आरोपसुद्धा संजय राऊत यांनी केलाय. राज ठाकरे काय म्हणतात याला महाराष्ट्रात किंमत नाही. मोरारजी देसाईंनंतर गुजरात आणि महाराष्ट्र येथे नेतृत्व करण्याची त्यांची इच्छा आहे. उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाच्या अस्मितेचा प्रचार करतात. त्यांची लढाई महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी आहे. गुजरातच्या दोन व्यापाऱ्यांनी आपल्या स्वार्थासाठी मुंबई आणि महाराष्ट्राची लूट चालवली. आणि अशा परिस्थितीत हे महाशय (राज ठाकरे) त्यांच्यासोबत आहेत. आम्हाला मोरारजी देसाई यांची आठवण झाली. गुजरातच्या दोन खतरनाक व्यापार करणाऱ्या विरुद्ध उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची लढाई सुरू आहे.

वणी येथे उद्धव ठाकरे यांच्या हेलिकॉप्टरमधील बॅगांची तपासणी करण्यात आली. त्यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदेंच्या लोकांना २५-२५ कोटी रुपये पोहोचले. सांगोल्यात १५ कोटी पकडले, परंतु केवळ ५ कोटी दाखवले १० कोटींचा हिशोब नाही. उद्धव ठाकरे यांची तपासणी करायला आमचा अजिबात आक्षेप नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या ताफ्यामधून बॅगा उतरतात. एकनाथ शिंदे नाशिक, शिर्डी येथे गेले. दोन तासांसाठी एका हॉटेलमध्ये थांबले तर १५-१६ बॅगा त्यांच्यासोबत होत्या, त्या कसल्या होत्या. आमच्या तपासण्या करता तर त्यांच्याही करा. करणार आहात की नाही? की यंत्रणा विकत घेतली आहे, असा टोलाही संजय राऊत यांनी लगावलाय.

## मेहकर विधानसभा मतदारसंघात सावत्रा येथे एका नवीन मतदान केंद्राची निर्मिती; आता ३५० मतदान केंद्र

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी:** विधानसभा निवडणूकीत मतदारांना मतदान करणे सोईचे व्हावे, यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदारसंघात मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार २५- मेहकर विधानसभा मतदारसंघामध्ये सावत्रा येथे नवीन मतदार केंद्राची निर्मिती करण्यात आली असून आता मेहकर मतदारसंघात ३५० मतदान केंद्र झाले आहेत.

मतदान केंद्राच्या रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी ज्या मतदान केंद्रांवर मर्यादेपेक्षा जास्त मतदार आहेत किंवा दोन गावातील मतदार एकाच मतदान केंद्रांना जोडण्यात आलेले होते, असे सर्व मतदान केंद्र मिळून जिल्ह्यात नव्याने २३ मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये मेहकर विधानसभा मतदारसंघातील सावत्रा येथील मतदान केंद्र क्रमांक-८१ जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत १ हजार ४०० पेक्षा जास्त मतदारांची संख्या असल्याने मतदान केंद्र क्रमांक-८२ सावत्रा जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेतील खोली क्रमांक २ येथे नवीन मतदान केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे मेहकर विधानसभा मतदारसंघात ३५० मतदान केंद्र झाले असून शहरी भागात ५९ तर ग्रामिण भागात २९१ मतदान केंद्र आहेत. नवीन मतदान केंद्राच्या निर्मितीमुळे कुटुंबातील सर्व मतदारांची नावे एकाच मतदान केंद्रावर उपलब्ध होणार आहेत.

३ लक्ष ५ हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क

२५-मेहकर मतदारसंघात ३ लक्ष ५ हजार ९६० मतदार असून त्यामध्ये १ लक्ष ५९ हजार ३७८ पुरुष तर १ लक्ष ४६ हजार ५७८ महिला व ४ तृतीयपंथी मतदार आहेत. ८५पेक्षा जास्त वयोमान असलेले मतदार ३ हजार ८५९ असून १ हजार ४०० पुरुष तर २ हजार ४५९ महिला मतदार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये प्रथमच मतदानाचा हक्क बजावणा रे ७ हजार ८६६ नवमतदार असून ४ हजार ८५७ पुरुष तर ३ हजार ८ महिला व १ तृतीयपंथी नवमतदार आहेत.

लोकसभेला जिल्ह्यात २ हजार २६५ मतदान केंद्र होती. यात २३ नवीन मतदान केंद्रांची वाढ होऊन २ हजार २८८ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. दि. १ जुलै २०२४ अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदान केंद्र सुसूत्रीकरणांतर्गत मतदान केंद्रात वाढ करण्यात आली आहे.

### मतदान यादीत नाव असल्याची मतदारांनी खात्री करावी- जिल्हाधिकारी डॉ. पाटील



भारत निवडणूक आयोगाने घोषीत केलेल्या कार्यक्रमानुसार दि. २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी सर्व मतदारांनी मतदानाच्या दिवशी मतदान करावे. यासाठी मतदारांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करुन घ्यावी. मतदार केंद्र जाणून घेण्यासाठी व्होटर हेल्पलाईन प किंवा ीिंशीी.शलळ.सीीं.ळप या संकेतस्थळाचा वापर करावा. तसेच मतदार नोंदणी किंवा मतदान केंद्राची माहिती शोधण्याच्या बाबतीत काही मदत हवी असल्यास १९५० या टोल फ्री क्रमांक किंवा मेहकर मतदारसंघासाठी हेल्प लाईन क्रमांक १८००२३३६३६१ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.